परिवहन समितीच्या **शनिवार दिनांक** ०३–०६–२०१७ रोजी **दुपारी** ०२:०० वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

**उपस्थित सदस्य**

| अ. क्र | नावे | पत्ता |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री. जितेंद्र धनराज कुकडे | **सभापती** |
| **2.** | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | **सदस्या** |
| **3.** | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | **सदस्या** |
| **4.** | मा. सौ. उज्वला प्रकाश शर्मा | **सदस्या** |
| **5.** | मा. सौ. विद्या योगेश मडावी | **सदस्या** |
| **6.** | मा. सौ. वैशाली देवचंद रोहणकर | **सदस्या** |
| **7.** | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | **सदस्या** |
| **8.** | मा. श्री. नरेंद्र नत्थुजी वालदे | **सदस्य** |

अनुपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री. प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| **2.** | मा. सौ. मनिषा आशिष धावडे | **सदस्या** |
| **3.** | मा. श्री. नितीश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य |
| **4.** | मा. श्री. नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| **5.** | **श्री. संदीप चंद्रभान जाधव**<br>**सभापती स्थायी समिती – पदेन सदस्य** | सदस्य |

उपस्थित अधिकारी

| अ. क्र | नावे | पत्ता |
|---|---|---|
| **1.** | **श्री. शिवाजी जगताप** | **परिवहन व्यवस्थापक** |
| **2.** | **श्री. हरिष दुबे** | **निगम सचिव** |

मा. सभापती, परिवहन समिती, यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक ०३**:– नागपूर महानगरपालिका परिवहन विभागातर्फे शहरबस परिवहन सेवा जी.सी.सी. (Gross Cost Contract) तत्वावर सुरू करण्यात आली असुन महानगरपालिका अधिनियमातील कलम ९७ व ९८ अन्वये परिवहन विभागाचे स्वतंत्र अर्थसंकल्प ''ब'' तयार करण्याबाबतचे तरतुदीनुसार सन २०१६–१७ चे चार महिन्याचे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१७–१८ चे वार्षिक अंदाजपत्रक प्रथमत: तयार करण्यात आले आहे.

उपरोक्त अर्थसंकल्प ''ब'' ला तत्कालीन मा. परिवहन सभापती यांनी तत्वत: मान्यता दिली असुन तत्कालीन मा. आयुक्त यांची देखील मंजुरी घेण्यात आली होती. नविन परिवहन समिती समोर मान्यता प्राप्त करून घेण्यास्तव सदर अर्थसंकल्प ''ब'' सादर करण्यात येत आहे. सन २०१७—१८ या आर्थिक वर्षाचे अर्थसंकल्प ''ब'' चे उत्पन्न रु. २५४५६.२३ लक्ष अपेक्षित आहे. सुरवातीचे शिल्लक रु १०,०००/— अपेक्षित शिल्लक धरून एकुण उत्पन्न रू २५४५६.३३ लक्ष हे अपेक्षित उत्पन्न गृहीत धरून या आर्थिक वर्षात रू २५४४५.०५ लक्ष खर्च होईल. त्यामुळे मार्च २०१८ अखेरची अपेक्षित शिल्लक रू ११.२८ लक्ष शिल्लकीचा अर्थसंकल्प ''ब'' यास मान्यता देण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन परिवहन व्यवस्थापकाने महानगरपालिका अधिनियम ९८ (१) अन्वये सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्प ''ब'' मध्ये फेरफार व बदल करण्याचे अधिकार परिवहन समिती सभापती यांना एकमताने प्रदान करण्यात येते व आवश्यक त्या बदलासहित उपरोक्त अर्थसंकल्प ''ब'' कलम ९८ (३) प्रमाणे स्थायी समितीसमोर ठेवण्याचे अधिकार सभापती परिवहन समिती यांना प्रदान करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक ०४</u>:— शहरबस वाहतुकीअंतर्गत वेळोवेळी वाहने संचालित होत असतांना वाहनांची यांत्रिकी स्थिती वाहन चालकाद्वारे वाहतुक नियमांचे उल्लंघन, अति वेग, गणवेश परिधान न करणे — बस मध्ये प्रथमोपचार/अग्निशमक यंत्र नसणे बस व चालकासंबंधी नियमांचे उल्लंघन मोटर वाहन कायद्याअंतर्गत झाल्यास ''ई—चालान'' तडजोड शुल्क संबंधित ऑपरेटर यांचेद्वारे भरणा करण्याची तरतुद अटी व शर्तीनुसार ऑपरेटर यांचीच आहे. तथापी, मनपाद्वारे संचालित बसेसमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहुन नेण्याकरिता जर चालान निर्गमित झालेले आहे. अश्या परिस्थितीत याचे दायित्व मनपाने घेणे आवश्यक आहे व फक्त क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहुन नेण्याच्या तडजोड शुल्क हा परिवहन विभाग, मनपा यांचेद्वारे भरणे आवश्यक आहे. करिता यास समितीने विचारात घेवून एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक ०५</u>:— शहरबस अंतर्गत दैनंदिन वाहतुकी दरम्यान कंन्डक्टर व प्रवासी वर्गामध्ये चिल्लर वरून बरेचदा वादविवाद होतात यास पायबंद घालण्यासाठी शहरबस वाहतुकरिता जाण्याऱ्या प्रत्येक कंन्डक्टरकडे रु. १००/— ची चिल्लर/नाणे दिल्यास यात तक्रारींना मोठया प्रमाणात आळा बसेल. अर्थातच, कामागिरीवर जाणाऱ्या वाहकाला रु. १००/— ची चिल्लर डेपोतुन दिल्यानंतर त्या कंडक्टरची ड्युटी पुर्ण झाल्यावर त्याचे हिशोबामध्ये त्याला दिलेल्या आगाऊ रक्कमे रु. १००/— चा अंतर्भाव राहील.

सध्य:स्थितीत फार मोठया प्रमाणात चिल्लर उपलब्ध होत असुन बहुतांश बँकासुद्धा नाणे, घेण्यास असमर्थता दर्शवित आहेत व त्याचवेळी वाहकांद्वारे चिल्लर ची टंचाई हे कारण पुढे करून प्रवासी वर्गाला तिकीट भाडयाला उर्वरित पैसे देण्यामध्ये अडचण निर्माण होत आहे.

करिता प्रत्येक वाहकामागे रु. १००/— ही ''Impressed Cash'' म्हणुन देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक ०६**:— नागपूर शहरबस संचालनाकरिता ‘‘ग्रॉस कॉस्ट कॉन्ट्रक्ट’’ या तत्वावर तीन नविन डिझेल बस ऑपरेटर व एक इथेनॉल संचालित ग्रीन बस ऑपरेटर यांची गत ६ महिन्यापुर्वी नेमणुक करण्यात आलेली असुन शहरबसेस चे संचलन सुस्थितीत राहण्याकरिता या सर्व ऑपरेटर वर नियंत्रण ठेवण्यासाठी आय.बी.टी.एम. (इंटीग्रेटेड बस ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट) ऑपरेटर म्हणुन डी.आय.एम.टी.एस., नवी दिल्ली यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.

आर.एफ.पी.तील तरतुदीनुसार, आय.बी.टी.एम. ऑपरेटर यांना मध्यवर्ती ठिकाणी मनपाच्यावतीने जागा व पायाभुत सुविधा उपलब्ध करण्याकरिता तत्कालीन मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेनुसार, मौजा—सिताबर्डी, नगर भुमापन क्र. २३९६, आराजी ४०३.४० चौ.मी. व त्यावरील इमारत असलेली नाका क्र. १३ चे कार्यालय, स्थावर विभागाचे पत्र क्र. ई.ओ/१९४०, दि. २१/११/२०१६ या अन्वये परिवहन विभागास ताबा प्राप्त झालेला असुन प्रथम मजल्यावर आय.बी.टी.एम. ऑपरेटर यांचे नियंत्रण कक्ष व तळमजला परिवहन विभाग यांचेकरिता देण्याचे निश्चित करण्यात आलेले असल्याने हा विषय परिवहन समिती समक्ष नोंदीकरिता ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मान्यता प्रदान केली

**ठराव क्रमांक ०७**:— **आजच्या सभेची कार्यवाही कायम करून ही सभा** अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
परिवहन समिती
महानगरपालिका,नागपूर